# बीकेसी स्थानक ९२ टक्के पूर्ण



म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

भूमिगत मेट्रो-३चे बीकेसी स्थानक ९२ टक्के पूर्ण झाले आहे. या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील हे अत्याधिक महत्त्वाचे स्थानक असेल. हा टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करण्याचे लक्ष्य असताना अधिकाऱ्यांनी बुधवार, २१ जूनला या स्थानकाची तातडीने पाहणी केली.

## अधिकाऱ्यांकडून तातडीची पाहणी

मेट्रो-३ ही राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका आरे ते कफ परेड अशी आहे. ३३ किलोमीटर लांबीच्या या मार्गिकेवर एकूण २७ स्थानके असतील. त्यातील आरे ते बीकेसी हा १० स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करणे प्रस्तावित आहे. यातील बीकेसी स्थानक हे केंद्रस्थानी असल्याने महत्त्वाचे आहे. त्याचवेळी पहिल्या टप्प्यातील नियंत्रण कक्षदेखील बीकेसी स्थानकातच उभे केले जात आहे. एकूणच बीकेसी स्थानक हे मेट्रो प्रकल्पातील सर्वाधिक मोठे स्थानक असून ते हब स्वरूपाचे असेल.

या सर्व पार्श्वभूमीवर मेट्रो-३ मार्गिका विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे व संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी स्थानकाला भेट दिली. त्यादरम्यान या स्थानकाचे बांधकाम ९२.३ टक्के व प्रणालीशी निगडित कामे ६१ टक्के पूर्ण झाल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.